नियमित दिवाणी दावा क्र.९/२०१७

रत्नमाला –वि– भिमराव

निशाणी क्र. ३२ लगत

**सरतपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. डी. एस. जाधव यांच्याद्वारे**

०५. मला माझी आई रत्नमाला पगारे यांनी प्रस्तुत दाव्याचे कामकाज पाहण्यासंदर्भात मुखत्यार पत्र करुन दिले होते. साक्षीदारास निशाणी क्र.४/१ कडे दाखल मुखत्यारपत्र दाखविण्यात आले. त्यावर सही असल्याचे व त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर असल्याचे साक्षीदाराने सांगितले. सबब, सदरच्या मुखत्यार पत्रास **निशाणी क्र.४७** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. पी. टी. शिरसाठ यांच्याद्वारे**

०६. वादी ही माझी आई आहे. माझ्या आईने प्रथमतः चार एकर क्षेत्र खरेदी घेतले होते. सदरचे क्षेत्र माझ्या आईस शरफोद्दीन फकरुद्दीन यांनी विक्री केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने सदरचे चार एकर क्षेत्र विकत घेण्यापुर्वी प्रतिवादींनी सदरचे क्षेत्र विकत घेतले होते. हे मला सांगता येणार नाही की, सदरचे क्षेत्र प्रतिवादींनी कोणाकडून विकत घेतले होते.

०७. हे म्हणणे खरे आहे की, नारायण अवकाळे याचेकडून पांडुरंग व गौतम पगारे यांनी विकत घेतलेले क्षेत्र व पांडुरंग व गौतम पगारे यांनी संताबाईकडून खरेदी घेतलेले क्षेत्र विभिन्न आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने शरफोद्दीन कडून खरेदी घेतलेले क्षेत्र हे विभिन्न आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६३ बद्दल गौतम पगारे यानेदेखील दिवाणी दावा क्र.१७/२००८ दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने यापुर्वी दिवाणी दावा क्र.१२२/२०१० याच दाव्यातील प्रतिवादींविरुद्ध दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये न्यायनिर्णय पारीत करुन तो नामंजूर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गौतम पगारे याने दाखल केलेला दावा व माझ्या आईने पुर्वी दाखल केलेला दावा हे दोन्ही दावे एकाच मिळकतीसंदर्भातील आहे.

०८. आजरोजी गट क्र.६३ मध्ये माझ्या आईच्या नावे तीन एकर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६३ मधील माझ्या आईच्या नावे असलेली जमीन तिने वादी क्र.३ व वादी क्र.४ यांना वाटुन दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६३ मध्ये आम्हा सर्व वादींच्या नावे व ताब्यामध्ये स्वतंत्र जमीन आहे. निशाणी क्र.४८ कडील ७/१२ उता–यामध्ये नमुद गौतम आनंदा पगारेच्या नावे नमुद असलेले क्षेत्र बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, गौतम पगारे च्या ताब्यामध्ये आजरोजी केवळ ७९ आर इतकीच जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६३ मध्ये प्रतिवादींच्या नावे २ हे. इतके क्षेत्र आहे.

०९. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा दावा जाणीवपुर्वक प्रतिवादींना त्रास देण्यासाठी

दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.६३ मधील अंदाजे ५ एकर क्षेत्र मला नारायण अवकाळे यांच्याकडून प्राप्त झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नारायण अवकाळे याचेकडून गौतम पगारे यास केवळ ५९ आर इतके क्षेत्र प्राप्त झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने गौतम पगारे याचेकडून ५९ आर इतके क्षेत्र खरेदी घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, उर्वरित जमीन गौतम पगारे यांच्या ताब्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०७.२००९ रोजी गट क्र.६३ ची सरकारी मोजणी झाली होती.

१०. आम्हा सर्व वादींची मिळून माझ्या म्हणण्याप्रमाणे गट क्र.६३ मध्ये १३ एकर जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीवेळी मोजणीदारास गट क्र.६३ मधील संपुर्ण क्षेत्र मिळुन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमिनी तीन व्यक्तींकडून विकत घेतल्या असल्याने दावा मिळकतीच्या चतुःसिमा दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे अस्तित्वात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पुर्वीचे दावे न्यायनिर्णीत झाले असल्याने प्रस्तुतचा दावा कायद्याने चालत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अतिक्रमीत क्षेत्र हे गौतम पगारे यांच्या ताब्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०७.२००९ रोजी दावा मिळकतीचीच मोजणी करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.६३ च्या एकुण क्षेत्रामध्येच तफावत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी मुलतः मी म्हणतो त्याप्रमाणे दावा मिळकतीच्या ताब्यामध्ये नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमुद मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

( मयुरेश आर. काळे)

दिनांकः १५.१२.२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, भोकरदन